Registered No 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ अकोला, रविवार ता० २६ जानेवारी सन १८७३ इ० अंक ४

## जाहिराती.

### वऱ्हाडसमाचाराचे किमतीविषयीं.

वर्तमानपत्राच्या पुष्कळ दिवसांच्या अनुभवावरून, देशांत अलिकडे जी पत्रांची प्रसृति होत चालली आहे तिजवरून, व आमच्या वऱ्हाडच्या लोकांस वर्तमानपत्र वाचण्याची कांहीं गोडी लागण्यास कारण व्हावें ह्मणून या जानुआरी महिन्यापासून वऱ्हाडसमाचाराच्या किमतींत आह्मी थोडा फेरफार केला आहे तो असा—

| | रुपये |
|---|---|
| किंमत वर्षाची आगाऊ | ६ |
| वर्ष अखेर दिल्यास | ७ |
| टपालाबद्दल | |
| वर्षाचे आगाऊ | १।८ |
| ,, अखेर | २ |
| तीन गृहस्थ एका गावीं पत्रें मागवितील तर एकेकास वर्षास आगाऊ वेगी हाशील | १ |
| पाच किंवा अधिक पत्रें एका गावीं घेणार असून तीं एकाचें नावें मागवितील तर प्रत्येकीं आगाऊ डाक हाशील वर्षाचें | ॥८ |
| सदर्हू वर्ष भरल्यावर देतील तर | १ |

खेडे गावचे पाटील पटवारी लोक व गरीब शेतकरी लोक तसेच लोअर क्लास स्कुलाचे मास्तर लोक यांस सदरील फेरफारापासून पत्र घेण्यास उत्तेजन यावें असें आमचें अनुमान आहे. व त्याप्रमाणें वऱ्याच अंशीं घडून येईल तर या वर्षाच्या दुसऱ्या सहा महिन्यांत याहूनही किमतीचे दर कमी करावे अशी आमची इच्छा आहे व ती सफल होणें आश्रयदात्यांच्या उदारपणावर अवलंबून आहे.

साल अखेर किंमत भरणारास ती पाठविण्याची तादृश काळजी असत नाहीं व पांच पांच वर्षांच्या किमती अजून कित्येकांकडे यावयाच्या आहेत असें पाहून किमतीचे अखेर दरांत आम्ही कांहीं फेरफार केला नाहीं.

आगाऊ किंमत देणें ती पत्र सुरू झाल्यापासून एक महिन्यांत यावी अशी आम्ही मुदत ठरवितों.

नोटिसा व जाहिराती छापण्याचे दर.

| | रु० |
|---|---|
| दहा ओळींचे आंत | १ |
| दहा ओळींहून अधिक असल्यास दर ओळीस | ०।१।६ |
| इंग्लिश भाषेंत नोटिस वगैरे छापविल्यास दर ओळीस | ०।४ |

नोटिस लिहिलेली न आणितां छापखान्यांतून लिहविल्यास २५ ओळीपर्यंत दोन आणे व त्याहून अधिक मजकूर असल्यास च्यार आणे लिहिणावळ पडेल. व इकडून रजिष्टर करविणें असेल तर वर्तमानपत्राचे अंकाबद्दल च्यार आणे, रजिष्टरबद्दल च्यार आणे, व डाक हाशिलाबद्दल अर्धा आणा मिळून साडेआठ आणे ओळीचे दराशिवाय द्यावे लागतील.

**गजकरणाचें औषध.**

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयाच्या आहेत हें औषध खात्रीचें असून यांपासून गुण लवकर येतो. लावतांनां आग मुळींच होत नाहीं औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें. किंमत ६ सहा आणे.

☞ हें औषध गजकरणाशिवाय खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

### पांचव्या पुस्तकांतील कवितार्थादि संग्रह.

आह्मी हें पुस्तक विद्वान गृहस्थांच्या साह्यानें तयार केलें आहे. यांत नवीन पांचव्या पुस्तकांतील कवितांची साधारण सर्व माहिती दिली आहे. ती अशी:—प्रथम कविता, मग अन्वय, पुढें अर्थ व शेवटीं कठिण शब्दार्थांची टीप. शिवाय आख्यानाचे आरंभीं त्याचा पूर्वापार संबंध लिहून प्रत्येक कवितेच्या डोक्यावर वृत्त गणसंख्या वगैरे माहितीही दिली आहे. सारांश हें पुस्तक विद्यार्थ्यांच्या फारच उपयोगीं पडणारें आहे. हें त्यांस अनुभवावरून कळून येईल. याचीं पानें सुमारें २५० होतील व किंमत सुमारें ०।१० आणे ठेविली जाईल. ज्यांस पुस्तकें पाहिजे असतील त्यांनी किती प्रती पाहिजेत त्याबद्दल आह्मास कळवावें. व आम्हास पाहिजे तितके वर्गणीदार जमले ह्मणजे पुस्तक छापण्यास आरंभ करूं व वर्गणीदारांसही पैसे पाठविण्याविषयीं सूचना करूं. पत्रें पाठविणें तीं "न्यायसिंधूचे मालक" यांचे नांवें पाठवावीं. पत्रें पाठविण्यास मुदत ता० १५ ज्यानेवारी सन १८७३ पर्यंत आहे.

अहमदनगर ता. ९ डिसेंबर सन १८७२ इ. } पुस्तकांचे मालक.

### जाहिरनामा.

विद्यमान असिस्टंट कमिशनर साहेब बहादुर इनचार्ज जिल्हा वाशीम यांजकडून जाहिरनामा—तमाम लोकांस कळविण्याकरितां प्रगट करण्यांत येतो कीं जिल्हा वाशीम एथील कलाली विषयुक्त पदार्थ अफू, गांज्याचा लिलाव सन १८७३।७४ इसवी सालाकरितां वाशीम एथें डिपुटि कमिशनर साहेब बहादुर यांचे आफिसांत ता. ५ माहे फेब्रुवारी सन १८७३ इसवी रोजीं १० वाजतां शुरू होईल. ज्यांची लिलाव घेण्याची मर्जी असेल त्यांणीं सदर्हू तारखेस नेमले ठिकाणीं हजर व्हावें.

लिलावाच्या शर्ती वगैरे सालगुदस्त प्रमाणेंच आहेत याबद्दल विशेष माहिती पाहिजे असल्यास सदर्हू तारखेचे आधी आठ दिवस डिपुटि कमिशनर साहेबांचे आफिसांत हजर झाले असतां मिळाली जाईल. कळावें ता० १० जानेवारी सन १८७३ इसवी.

(सही) मे. फिटझरल्ड असिस्टंट कमिशनर इनचार्ज जि० वाशीम.

### जाहिरनामा.

विद्यमान डिपुटि कमिशनर साहेब जिल्हा अकोला प्रांत पश्चिम वऱ्हाड यांजकडून सर्व लोकांस कळावयाकरितां लिहिण्यांत येतो कीं, अकोलें जिल्ह्याचा सेन १२८३ फसली सालाबद्दल सन १८७३।७४ इसवी सालचा अबकारीचा लिलाव साल्याबादप्रमाणें ता. ४ माहे फेब्रुवारी सन १८७३ इसवी रोजीं मुक्काम अकोलें एथें कचेरीवर बरोबर अकरा वाजतां शुरू होईल ज्यांची इच्छा असेल त्यांणीं नेमले वेळेस हजर व्हावें.

गुदस्त सालाप्रमाणेंच यंदा गटवार हरास होईल. याबद्दल विशेष माहिती व त्या कामाची यादी लिलावाचे तारखे पूर्वीं आठ दिवस प्रसिद्ध ठिकाणीं डकविली जाईल. कळावें ता० ९ माहे जानेवारी सन १८७३ इसवी मुक्काम हिवरखेड तालुके अकोट.

(सही) जे. जी. बेल. डिपुटि कमिशनर जिल्हा अकोलें.

### NOTICE.

The Akola District Abquarri contracts &c. for the ensuing official year 1873—74 will be sold as usual by public auction on the 4th day of February 1873, at the Deputy Commissioner's Catchery at Akola.

Sales will commence at 11 A.M.

(Signed) J. G. Bell.
Deputy Commissioner

Deputy Commissioner's office Akola District camp Hiwarkhera 9th January 1873.

### नोटिस.

नोटिस—नवलाजी वल्लद रावजी तेली खत्री राहणार रिसोड यास खालीं सही करणार इजकडून कळविण्यांत येत आहे कीं आज नऊ वर्षें झालीं. मला माझे बापापाशीं टाकून देऊन तूं घरीं बसला आहेस याबद्दल पोटखर्चाचे रुपये आज तारखेपर्यंत लोकांचे देणें पांचशें रुपये झालें आहे. याजकरितां तुला मी तारीख २४ नोवेंबर सन १८७२ चे वऱ्हाडसमाचार पत्रांतून नोटिस दिली होती परंतु तूं तें रजिस्टरपत्र न घेतां परत केलें. यास्तव पुन्हा हल्लीं नोटिस देण्यांत येते कीं, आज तारखेपासून पंधरा दिवसांचे आंत सदरील पांचशें रुपये देऊन मजला आपले घरीं न्यावें तसें न केल्यास मी अन्नवस्त्राचा दावा करून शिवाय लग्नाचा हक्क नाहींसा करण्याबद्दल दिवाणी कोर्टांत दावा करीन. सदरील मुदतीचे आंत वर लिहिलेप्रमाणें गोष्टी तुजकडून न झाल्यास मजवर तुझा कोणते प्रकारें हक्क नाहीं. मी पाट वगैरे लावण्यास मुखत्यारी मिळवीत कळावें. तारीख १७ माहे जानेवारी सन १८७३ इसवी.

[सही] सारजी मर्द नवलाजी खत्री हल्लीं मुक्काम बाळापुर. इचे हातची रेघ

### पत्रव्यवहार.

या सदरांतलील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वणीहून—वि. वि. आपली माझी पहिलीच ओळख आहे त्यास कृपा करून आपल्या सुंदर पत्रांत माझ्या चार ओळींपुरती जागा द्याल अशी आशा आहे.

कसबे वणी तालुके व जिल्हे मजकूर येथील स्कुलाची परिक्षा तारीख ३१ माहे डिसेंबर सन १८७२ रोजीं झाली, व बक्षिसें वाटण्याच्या समारंभाच्या वेळीं पुष्कळ मंडळी जमली होती त्यावेळीं डे. इ. जिल्हा वणी यांनीं जें भाषण केलें त्याजवरून असें दिसून येतें कीं, शाळेची परिक्षा बरी उतरली, व हेडमास्तर यांनीं मुलाला ज्यास्ती हौस यावी या हेतूनें आपल्या पदरचीं पाहिल्या व दुसऱ्या वर्गाचे मुलांस ४ रुपयांचीं पुस्तकें वाटलीं तेणेंकरून मुलांस फार आनंद होऊन ज्यास्ती अभ्यास करण्याची उमेद आली. असें जर मास्तर लोक करतील तर मुलांस उमेद येऊन शाळेचा पु[illegible] फायदा होईल.

येथें लायब्ररी स्थापन हो[illegible] न महिने झाले. परंतु ति[illegible] कांस समजलें नव्हतें अलीकडे [illegible] व सेक्रटरी यांनीं बरीच मेहनत घेऊन लायब्ररीची स्थिति बरीच चालविली आहे. परंतु अध्यक्ष यांजला कामाच्या फुरसतीमुळें येण्यास बनत नव्हतें. त्याजवर तारिख २९ रोजीं हेडमास्तर व डे. इं. इ. यांनीं जें भाषण केलें त्या वेळीं अध्यक्षांनीं असें ह्मटलें कीं, किती जरी काम असलें तरी आह्मी नाऊं. अशीच जर सर्व लोक मेहनत घेतील तर थोडकेंच दिवसांनीं लायब्ररी चांगल्या दशेस येईल. लायब्ररीला नेमणुका आहेत त्या—

अध्यक्ष
तहशिलदार व नायब तहशिलदार
उपाध्यक्ष
हेडमास्तर इंग्लिश मराठी शाळा वणी
सेक्रटरी
फर्ष्ट असिस्टंटमास्तर इंग्लिश मराठी शाळा वणी
सभासद
निळकंठ लक्ष्मण सर[illegible] व मल्हार देशमुख, गणेश [illegible]

कदम, व्यंकटेश कोनेर भेदी, रावसाहेब देशपांडे, रामचंद्र मोरेश्वर कारकून, दानी रामचंद्र मास्तर निसबत तहशिलदार, नारायण सखाराम साळपेकर वगैरे मंडळी आहे. यांनीं जर विशेष लक्ष्य पुरविलें तर लायब्ररी उत्तम दशेस जाऊन पोंहोचेल अशी आशा आहे कळावे लोभाची वृद्धी निरंतर असावी.

ता० ९ माहे जानेवारी } गरीब रहवासी
सन १८७३ इसवी } मुक्काम वणी.

वऱ्हाडसमाचार.

मिति पौष वद्य १३ शके १७९४

## मुंबईच्या गवरनर साहेबांचें भाषण.

या महिन्याच्या १४ वे तारखेस मुंबई एथें युनिव्हार्सिटीच्या पदव्या देण्याची वार्षिक सभा भरली होती तींत अध्यक्षाच्या नात्यानें तेथील गवरनर सर फिलिफ वोडहौस साहेब यांनीं भाषण केलें त्याचा कांहीं भाग चांगला आहे व कांहीं टीका करण्याजोगा आहे सबब आजच प्रसंगीं आम्ही त्यांचें भाषण तात्पर्यानें लिहितो पुढील अंकांत त्यावरील टीका लिहू.

गवरनर साहेब ह्मणाले कीं युनिव्हार्सिटीच्या समारंभांत भाषण करण्याची आमची ही पहिलीच पाळी आहे. मागील सालाची हकीकत रिपोर्टावरून पहातां समाधानकारक दिसते. व तिजपासून पुढील चांगल्याविषयीं उमेद येते. कच्छचे राव यांनीं आपले राष्ट्रांतील विद्यार्थ्यांस पुढील विद्याभ्यासास उत्तेजन येण्याकरितां स्कालरशिप्स देण्यासाठीं ४९००० रुपये दिले आहेत हें ऐकून आह्मांस फार संतोष वाटतो हें त्यांचें औदार्य व विद्येविषयीं आस्था इतर थोर लोकांस उदाहरण घेण्याजोगें आहे. म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेत मागील सालापेक्षां या वर्षीं पुष्कळ विद्यार्थी पास झाले यावरून शिक्षक लोक त्यांकडून चांगला अभ्यास करवितात असें दिसून येतें. या वर्षीं पास झालेल्या लोकांच्या विद्यालयांची जी संख्या पहाण्यांत आली तीवरून मुंबई इलाख्यांतून किती लांबलांबचे मुलगे येऊन परीक्षेंत पास झाले व विद्येनीं साभ्रनें चोहोंकडे कशी फैलावली तें स्पष्ट कळतें. वऱ्हाडांतील अकोल्याचे व माळव्यांतील इंदूरचे मुलगे परीक्षेस येऊन पास झाले याबद्दल आह्मांस संतोष वाटतो व यापुढें साऱ्या वऱ्हाडांतील, मध्यप्रांतांतील, व मध्य हिंदुस्थानांतील देखील मुलगे परीक्षेस येऊं लागतील अशी आम्ही आशा करितो. या वर्षीं सरकारी शाळांशिवाय लोकांच्या खासगी शाळांतीलही कित्येक विद्यार्थी परीक्षेस येऊन पास झाले हा आह्मी शुभशकुन समजतो. हें पाहून संपत्तिमान् लोकांस आपल्या मुलांकरितां खासगी शाळा अधिक ठेवण्यास हौस उत्पन्न होईल. या आमच्या शाळा व कालेजें यांत शिकणारे तरुणांचा मोठा समुदाय गरीब व सामान्य प्रतीच्याच लोकांचा आहे व यावरून मोठाले संपत्तिमान आणि स्वतंत्र असे लोक विद्येविषयीं बेपर्वा किंवा उदास दिसतात हें पाहून आह्मांस दुःख वाटतें. या त्यांच्या कृतीनें विद्येच्या प्रसारार्थ झटणाऱ्यांची मोठी नाउमेद होणार आहे. संपत्तिमान आणि स्वतंत्र असे लोक जोंपर्यंत विद्येस चहाणार नाहींत तोंपर्यंत त्या कामीं झटणारे लोकांस वाटेल कीं, आपले प्रयत्नाची सिद्धी फारच थोडी होत आहे. जर वरील प्रतीचे लोक उत्तम साधनें असताही विद्या व ज्ञान प्राप्त करून घेत नाहींत तर तें त्यांचें करणें अप्रशस्त व त्यांच्याच नुकसानास कारण होणार आहे असें ह्मणण्यास आह्मांस कांहीं हरकत दिसत नाहीं. याकरितां या लोकांच्या मनोवृत्ती पालटल्या पाहिजेत. आगगाड्या, तारायंत्रें, उत्तमविद्या हीं साधनें यांच्या वृत्ती पालटण्यास दुर्बल आहेत असें नाहीं. व संपन्न आणि स्वतंत्र लोक तूर्त विद्यासाधनांची हयगय करीत पण इतर दृढनिश्चयी लोकांनीं त्यांचीं तीं साधनें हिरावून घेऊन फायदा करून घेतला असें जेव्हां त्यांच्या दृष्टोत्पत्तीस येईल तेव्हां त्यास पस्तावा होईल व मग ते त्या मार्गास लागतील. थोड्या आठवड्यापूर्वीं नामदार गवरनर जनरल साहेबांनीं आपला निश्चय सांगितला कीं, नेटिव राजे व संस्थानिक यांची स्थिति व स्वातंत्र्य रक्षण करावें अशी ब्रिटिश सरकारची पूर्ण इच्छा आहे. त्याचप्रमाणें आह्मी ही प्रसिद्धपणें सांगतो कीं हिंदुस्थानांतील संपत्तिमान आणि स्वतंत्र लोक यांची थोरवी व स्वातंत्र्य अढळ राहवें अशी आमची इच्छा आहे परंतु त्याकरितां सरकार कांहीं करणार नाहीं, ह्मणजे ती थोरवी व तें स्वातंत्र्य त्यांचे त्यांनीं संरक्षिलें पाहिजे. जर ते हयगयीनें व बेपरवाईनें स्वस्थ बसून आपणापेक्षां हलके प्रतीच्या लोकांस अधिक विद्या प्राप्त होऊं देतील तर ते आपले आपण दोषी होतील व दुःखास कारण करून घेतील. मोठाल्या हलक्या सालक्याही लोकांत विद्येचा फैलाव झाल्यावर त्या लोकांस त्यांत वागण्यास व त्यांवर वर्चस्व ठेवण्यास फार जड जाईल हें सांगणें नकोच.

पुढें गवरनर साहेब ह्मणाले कीं, या रिपोर्टावरून कायद्याच्या अभ्यासाकडे लोकांची प्रवृत्ति दिसत नाहीं हें पाहून आह्मांस आश्चर्य वाटतें. कायद्याचें अवलंबन हा लोकांस सोयीचा व मोठा आवडता विषय असेल असें आह्मांस वाटत होतें पण फारच थोड्या विद्यार्थ्यांचें त्याकडे लक्ष्य आहे असें दिसून येतें. या वर्षीं त्या विषयांत फक्त एका गृहस्थाला पदवी मिळाली. अशी स्थिति असणें दुःखकारक होय. एक दोन वर्षांपूर्वीं कायद्याची परीक्षा अवघड झाली होती असें ऐकलें ते कदाचित खरें असेल पण त्यामुळें लोकांनीं कायद्याचा अभ्यासच सोडून द्यावा हें आमचें मतें चांगलें नाहीं. वैद्यक विषयाची गोष्ट त्यापासून अगदीं निराळी झाली आहे ह्मणजे त्या विषयांत बहुत विद्यार्थी तयार झाले व त्यांस जागा व पदव्याही मिळाल्या आहेत. आतां सिव्हिल इंजिनियारिंग प्रकरणाविषयीं पाहिलें तर लोकांचा असा समज दिसतो कीं, इंजिनियरिंग प्रकरणाच्या कामनिक विद्येंत जे विद्यार्थी तयार होत आहेत त्यांस जागा देणें हें सरकारचें काम आहे. पण आह्मी असें ह्मणतो कीं, त्यांस इंजिनियारिंग कालेजांत जी विद्या प्राप्त होते ती फक्त पदव्या मिळविण्याचीच कामाची आहे अनुभविक ज्ञान त्यांस नाहीं व त्यावाचून त्यांस सरकारच्या पब्लिक वर्कस खात्यांत मोठाल्या जागा देतां येत नाहींत. वास्तव त्यांचे काल्पनिक ज्ञानाशीं कामाच्या अनुभवजन्य ज्ञानाचा मेळ पाहिजे व त्यासाठीं त्या लोकांनीं हलक्या प्रतीच्या जागा प्रथम पतकरून माहितगार होऊन मग पुढें परीक्षा देऊन वाढत गेलें पाहिजे व सरकार तशा प्रतीचा कांहीं मार्ग काढील अशी आम्ही आशा करितो. त्यावाचून लोकांत मोठी गडबड आणि नाउमेद होण्याचा संभव आहे.

नंतर गवरनर साहेब ह्मणाले कीं, या देशांतील विद्येच्या व ती शिकणारांच्या संबंधानें सरकार किती जबाबदार आहे या विषयींचें आम्ही आपलें मत या प्रसंगीं थोड्याच शब्दांनीं सर्वांस कळवूं इच्छितों. ही गोष्ट फार महत्वाची व सर्वांस समजण्यास अवश्यक अशी आहे. शिकलेल्या लोकांचें असें मत दिसतें की सरकारी विद्यालयांतून आह्मी मोठमोठाले विषय शिकून परीक्षा द्यावयाच्या ह्मणजे सरकारावर मेहेरबानी करावयाची, व त्याप्रमाणें यांनीं आपली विद्या पुरी केली ह्मणजे सरकारानें त्यांविषयीं काळजी बाळगून निमुटपणें यांच्या चरितार्थाची योग्य तजवीज केलीच पाहिजे. आतां पहा, हें स्पष्ट आहे कीं, जर विद्येचा प्रसार जास्ती होत आहे व वर्षानुवर्ष विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे तर त्यांत तयार होणाऱ्या सर्व मनुष्यांस चाकऱ्यांचा पुरवठा करणें सरकारास केवळ अशक्य आहे. तसाच आणखी एक मुद्दा आहे. ईश्वरकृपेनें हिंदुस्थान देश ब्रिटिश सरकारचे सत्तेंत आलेला आहे. व त्यांच्या मुलखाची हद्द आणि जबाबदारी हळूहळू वाढत चालली आहे. आह्मी ब्रिटन देशचे आहों, आणि हिंदुस्थानचे सर्व लोकांस न्यायानें वागवावें असें आमचें कर्तव्य आहे. हिंदुस्थानांत राहणाऱ्या सर्व लोकांचीं सुखें नियमानें चालवावीं, त्यांवर पैरवी ठेवावी, त्यांचें संरक्षण करावें व तीं वाढवतील तितकीं वाढवावीं या विषयीं आह्मी बांधले गेलों आहों, विद्यालयांतून शिकलेल्या लोकांच्या इच्छाच पूर्ण रितीनें तृप्त कराव्या. आणि बाकीच्या लोकांच्या गरजा पुरवूं नयेत, व त्यांचा अभरवसा करावा हा आमचा धर्म नाहीं. वास्तव विद्यालयांतील लोकांच्या सोयीविषयीं व पगाराविषयीं सरकार त्यांच्या कल्पनेप्रमाणें सर्वांशीं बांधलें गेलें आहे असें नाहीं.

नंतर पगाराविषयीं गवरनर साहेबांनीं विशेष सांगितलें. ते ह्मणाले कीं, पगाराविषयीं लोकांची मोठी गैरसमजूत आहे व त्यामुळें ते निराश आहेत. आह्मीं इंग्लिश लोक एथें आहोंत हे परदेशीय आहोंत इकडील हवापाणी व सोयी आमच्या देशाप्रमाणें आह्मांस अनकूल नाहींत. व त्यामुळें आमच्या देशांत आह्मांस जे सुखोपभोग व फायदे आहेत ते बहुतेक हिंदुस्थानांत नाहींत. व ते सर्व सुखोपभोग आणि फायदे इकडे सरकार चाकरीत असलेल्या नेटिव लोकांस यथेच्छ आहेत. आह्मा इंग्लिश लोकांच्या मुलांनां इकडे शिक्षण मिळत नाहीं. आमच्या इंग्लंडातील राहाण्या वागण्याच्या रीतीप्रमाणें इकडे आह्मांस राहवत वागवत नाहीं. नेटिव लोकांच्या व युरोपियन लोकांच्या पगाराची तुळणा करितां कामा नये. इकडे इंग्लिश लोक नोकरीवर आले ह्मणजे त्यांच्या लेकरांची व त्यांची ताडातोड होते. थोडे आजारी पडले कीं, स्वदेश पाहावा लागतो. व त्या शिवाय दुसरेही बहुत त्रासकारक आणि तोट्याचे प्रकार आहेत. तेव्हां इतके अडथळे, संकटें, व प्रयास इंग्लिश लोकांस आहेत याबद्दल त्यांस बचपा काय आहे ह्मणाल तर द्रव्य होय. मोठ्या पगाराचेच लालचीनें आमचे इंग्लिश लोक हीं सर्व दुःखें सहन करितात. नेटिव लोक आपले देशांत आहेत, आपल्या जन्मभूमीचे ठायीं आहेत. घरंदाज आहेत, मित्रांमध्यें आहेत, व आप्त सोयऱ्यांमध्यें आहेत त्यापक्षीं त्यांचा मोठ्या पगाराविषयीं इंग्लिश लोकांशीं बरोबरीचा हक्क कसा पोंचेल? विलायतेंत इंग्लिश लोकांनां सरकार चाकरींत शिरतांनां आरंभीं पुरतें १०० रुपये सुद्धां महिना मिळत नाहींत. व त्यांनां सुमारें ८०० रुपये पगाराच्या उत्तम स्थितीला त्याच खात्यांत येण्यास ४० वर्षें लागतात व ही गोष्ट तरी उत्तम विद्वान व बुद्धिमान अशा इंग्लिश लोकांसच लागू आहे. तेव्हां या दृष्टीनें पाहिलें असतां युरोपियन लोकांस हिंदुस्थानांत पगार जास्ती व आह्मा नेटिवांस कमी असें ह्मणून नेटिवांनीं सरकारास दोष लावणें केवळ अयुक्तिक आहे. वास्तव नेटिवांकरितां स्थापिलेल्या विद्यालयांतून त्यांनीं अभ्यास करावा व आपला फायदा करून घ्यावा हें त्यांचें कर्तव्यकर्म आहे. सरकारांत सवड असेल तितक्या जागा सरकार त्यांस देतच आहे.

शेवटीं गवरनर साहेब ह्मणालें कीं विद्वान लोकांनीं विद्या शिकण्यांतच तृप्त असूं नये. ती आपले देशबांधवांत फैलावण्यास ते झटतील असा आम्ही भरवसा बाळगतो. व असें करण्यानें ते आपलें स्वतां राज्य चालविण्यास लवकर तयार होतील. राष्ट्रांत विद्येचा प्रसार करणें व राष्ट्राची राज्यसत्ता परत मिळविणें हें शिकलेल्या लोकांवरच अवलंबून आहे. याजकरितां तुम्ही राज्य करण्यास तयार व्हाल तेव्हां ज्यांवर राज्य कराल त्या लोकांस ही पूर्वींच सुशिक्षित करून ठेविलें असत

तो राज्याचा पाया उत्तम हा. आणि तो सर्वत्र सुधारणेचा दिव[स] येईल त्या दिवशीं आम्ही आपलें काम [आ]ज संपलें असें ह्मणून समाधान वृत्तीनें [तु]ह्माला अभिवंदन करून स्वदेशीं परत [जा]नयास तयार होऊं.

याप्रमाणें गवरनर साहेबांचें भाषण झा[ल्याव]र सर्वांनीं आनंदानें टाळया पिटल्या.

## वऱ्हाड

मि॰ लायल साहेब कमिशनर पश्चिम [व]ऱ्हाड हे वाशिमाकडे आहेत. व २८ वे तारखेस तेथें सेशन आहे. त्यांचे क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. विष्णु सदाशिव पिंपळकर कांहीं घरच्या अडचणीवगैरे करितां येथें होते ते २२ वे तारखेस तिकडे गेले.

—000—

मनिआर्डरचें ह्मणजे सरकारी हुंड्या देण्याघेण्याचें सरकारी दुकान असे व त्यावर एक एजंट म्हणजे अडत्या असे. व त्यास त्या व्यापारावर कांहीं कमिशन मिळत असे. हल्लीं सरकारानें एजंटाची नेमणूक व कमिशन हीं रद्द केलीं. व सरकारचे इतर पैशाचे कामाप्रमाणें हें मनिआर्डरचें कामही खजीन्याकडील आफिसरानीं करावें असा सरकारानें ठराव केला व त्याप्रमाणें इकडे व्यवस्था झाली.

—000—

बुलढाण्याकडील एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर मि॰ अबदुल हक्क हे अविवाहित होते यानीं नगरास जाऊन मि॰ मीर चिरागुदीन यांच्या बहिणीशीं १६ वे तारखेस विवाह केला.

—000—

मेजर जनरल लमस्डन साहेब क्वार्टर मास्तर जनरल जे थोडे दिवसांमागें हैदराबादेस आफिसियेटिंग रेसिडेंट होते त्यास दोन वर्षांची रजा मिळाली व ते विलायतेस जाणार.

—000—

अकोल्याचे म्युनसिपल कमेटींत रा. रा. माधवराव हरि सहस्त्रबुद्धे व रा. रा. पांडुरंग दामोदर दवणकर यांस मेंबर नेमण्याचा विच्यार झाला आहे.

—000—

रा. रा. अमृतराव आबाजी एथील वकील यांस अडचणीवर अडचणी येऊं लागल्या आहेत हें पाहून आह्मांस वाईट वाटतें. थोड्या दिवसां मागें हे पहिले प्रतीचे वकील अशी आख्या होती व यानीं पैसेही पुष्कळ मिळविले पण आज त्यांवर असा दिवस आला आहे कीं, लोकांचे कर्जाकरितां त्यांचें घर व घरांतील जिनसा सर्व जप्त झाल्या आहेत. तरी कित्येक लोकांचीं ऋणें शिल्लक आहेत.

—000—

अकोल्यांतील साहेब लोकांच्या स्वाऱ्या बाहेर फिरावयास गेल्या आहेत. ह्यामुळें कामाचा फार घोटाळा होऊन पक्षकार वकील, व साक्षीदार लोक यांचें नुकसान होत आहे. एक क्या॰ निकोलट साहेब एथें आहेत पण ते आजारी असल्यामुळें नेमलेलीं कामें त्या त्या दिवशीं त्यांच्याकडून होत नाहींत. तशींच बाहेरगावचीं कामेंही नेमल्या दिवशीं नेमल्या गांवीं होत नाहींत व त्यामुळें रयतेस मोठा ताप होत आहे. मि॰ नौलिस साहेबांकडे चार चार वेळ नेमलेल्या तारखा टळल्या आहेत. व रयत लोक खर्च खात परत गेले आहेत याबद्दल आह्मांस त्यांची दया येते. पण उपयोग काय? साहेब बहादुरांस आली पाहिजे.

—000—

अकोटचे तहशिलदार रा. रा. एकनाथ मोरेश्वर कान्हेरे याविषयीं पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. ९ वे तारखेच्या टाइम्स आफ इंडियामध्यें एक पत्र प्रसिद्ध झालें आहे त्यांत लिहिलें आहे कीं, अकोटचे तहशिलदार बरेच जुलमी होत चालले आहेत. ते आपल्या तर्हेतीप्रमाणें वागतात. वरिष्ठ कांहीं विच्यारकरीतील याचे त्यांस भय वाटत नाहीं. श्रीमंतांचीं व वजनदार लोकांचीं ते कामें करितात व त्यांची दाद घेतात. गरीब व अडाणी लोकांची दाद त्यांकडे लागत नाहीं. वरिष्ठांकडे पुष्कळ वेळां अर्ज झाले व त्यांनीं तहशिलदारांस चेकही कित्येक वेळां दिले पण त्यांपासून कांहीं फळ झालें नाहीं. अकोटास टेलिग्राफ आफिस बांधिलें त्याचा पैसा तहशिलदाराकडून कंट्राक्टरास मिळावयाचा तो सर्व मिळाला नाहीं. व त्याबद्दल त्यानें तहशिलदारावर फिर्याद केली आहे

आतां या सर्वच गोष्टी खऱ्या असतील असें आम्हास वाटत नाहीं. तथापि फार बोभाटा झाला त्या अर्थीं एकनाथरावांनीं त्यांविषयीं विचार करावा.

अकोट तहशिलींतील कारकून शंकर श्रीकृष्ण यानें तहशिलदाराचे त्रासानें राजीनामा लिहून दिला व तो तहशिलदारानीं तालुक्याचे असिस्टंट साहेबांकडे मंजुरातीस पाठविला. कारकून मजकूर यांची वर्तणूक सदोष नसून राजिनामा खुशीचा नाहीं, व नोकरी पुष्कळ दिवसांची आहे असें पाहून असिस्टंट साहेबांनीं राजिनामा मंजुर न करितां त्याची बदली करावी असा डिपुटि साहेबांकडे अभिप्राय लिहिला पण मेजर बेल साहेब डिपुटि कमिशनर यांनीं त्या कामीं चांगली नजर पुरवून त्या कारकुनास इनसाफ दिला. ह्मणजे त्याची बदली देखील न करितां तहशिलदारास टपका दिला. स्वतां सदोष असून तो आपला दोष छपविण्याकरितां दुसऱ्या पदार्थाला नावें ठेवतो अशा प्रकारच्या मनुष्यास मराठींत एक ह्मण आहे कीं, "स्वयपाक येईना तर ओलीं लाकडें; व नाचायला येइना तर अंगण वाकडें" ही ह्मण बेल साहेबांनीं आपले हुकुमांत लिहून तहशिलदारास टपका दिला आहे. व दुसऱ्याही एका प्रकरणांत तहशिलदारांची सुस्ती पाहून त्यांस यापुढें असें घडल्यास एकदम दंड केला जाईल असें लिहिलें आहे. इत्यादि प्रकारांवरून पाहतां आमचे हुशार तहशिलदार एकनाथराव इतके खोडकर कशानें झाले असावेत याविषयीं कल्पना येऊन फार वाईट वाटतें.

—000—

मि॰ क्यांडी साहेब विद्याखात्याचे डायरेक्टर वाशिमाहून पुढें न जातां गेल्या शुक्रवारीं एथें माघारे आले. क्या॰ निकोलेट साहेब आजारी आहेत व ते रजेवर जाणार ह्मणून त्यांचें समाचाराकरितां आले असावेत.

—000—

या आठवड्यांत थंडी अगदीं कमी झाली. आतां अंगावर वस्त्र घेण्याचेंही विशेष कारण पडत नाहीं. यावरून उन्हाळाही सालमजकुरी प्रखर होणार असें दिसतें.

—000—

वणी जिल्ह्यांतील दिगरस येथून आम्हास पत्र आलें आहे त्यांत तेथील नवीन हेड मास्तराचे योगानें शाळा बिघडली म्हणून मजकूर आहे, परंतु त्या पत्राखालीं खरी सही नसल्याकारणानें आम्हास त्या लेखाविषयीं भरवसा वाटत नाहीं.

—000—

इचलकरंजीकर नाटकवाले खामगावास आले आहेत व एक दिवसाआड त्याचे तेथें खेळ होत आहेत. आणि शंभराहून अधिक रुपये दर खेळास मिळत आहेत. अशा मजकुराचें आम्हास एक पत्र आलें आहे.

—000—

ले. आर. एल. प्राइस वऱ्हाडांतील रेविन्यु सर्व्हेकडील असि. सुपरिंटेंडेंट यांस हैसुराकडे दिलें.

—000—

अकोल्याचे नायब तहशिलदार रा॰ विनायक महादेव गाडगीळ यांस रेसिडेंट साहेबांच्या तंबूची व्यवस्था बरोबर न लाविल्यामुळें २९ रुपये दंड झाला असें समजतें.

—000—

वाशिमास क्लार्क आफ धि कोर्टचे आफिशियेटिंग काम पाहण्यास अकोल्याचे रा. रा. हणमंत रामचंद्र जुडि॰ शिरस्तेदार यास पाठवावें ह्मणून क्या॰ फिटझारल्ड साहेबानीं इकडे लिहिलें होतें परंतु थोडे दिवसांचें काम ह्मणून मेजर बेल साहेब त्यास पाठवित नाहींत असें समजतें.

## मागाहून आलेली नोटिस.

नोटिस—सर्व व्यापारी व साहू लोक यांस रामुलाल भगुलाल साहू दुकान अकोलें याजकडून देण्यांत येतें कीं आमचे दुकानचे वहिवाटदार कन्हयालाल इंद्रदास आगरवाले वस्ती अकोलें ह्या दुकानचे मालक पन्नाबाई भ्रतार भगुलाल इचे मुखत्यार पत्रावरून होते. हल्लीं तारीख १७ माहे जानेवारी सन १८७३ इसवी पासून सदरहू इसमास बर्तर्फ करून त्याचे मुखत्यारपत्र रद्द केलें आहे आह्मीं आमचे दुकान संबंधी त्याजकडेस कांणतेही कामकाज नाहीं हे सर्वांस कळावें तारीख २४ माहे जानेवारी सन १८७३ इसवी.

(सही) रामुलाल भगूलाल दस्तुर गणोबा राघोबा मुनीम.

## वर्तमानसार

मुंबईचे गवरनर साहेब सुरतेस जाऊन पुढें अमदाबादेस गेले आहेत.

गेले महिन्याचें १७ वे तारखेस एडिंबरो एथें लार्ड विलियम हे बंगाल सिविल सर्विसपैकीं यांनीं पार्लमेंटांत हिंदुस्थानचा संबंध या विषयावर मोठें सुरस व्याख्यान दिलें. विलायतेंतील परोपकारी पुरुष तेथें आमच्या हिंदुस्थानाविषयीं बरेच खटपट करूं लागले आहेत पण अजून त्याचें प्रारब्ध चांगलेसें उघडत नाहीं

गुजराथेंतील बलसाडचे हलिम भाई हुसेन भाई यांनीं धर्मपुरचे राजावर गैर रितीनें कैदेंत ठवल्याबद्दल नुकसानीची ६००० रुपयांची, व कर्जाबद्दल १२०००० रुपयांची, अशा दोन फिर्यादी सुरतेस एजंट कोर्टांत केल्या आहेत.

कलकत्त्यास एका युरोपियन कंट्राक्टरानें स्टेट सेक्रेटरीवर ३३४००० रुपयांचा दावा मि॰ जस्टिस टर्नर यांपुढें मांडिला आहे.

इंदुरास कांहीं प्रकरणीं गुन्हेगाराची नायकामुळेंही कैद करण्याची चाल होती ती आतां बंद झाली.

देवळाली व नाशिक यांच दरम्यान वालदेवच्या नदीस पूल बांधिला त्यांस ४०००० रुपये लागले.

याकंदकडे या वर्षीं लढाईची मोहिम होईल असा रंग असल्याविषयीं टाइम्सास हें वर्तमान आहे.

मुंबई हायकोर्टांतील जड्ज मि॰ जस्टिस लाइड थोडे दिवसांत विलायतेस जाणार व त्यांचे जागेवर सिंधचे जुडिशियल कमिशनर मि॰ वेस्ट साहेब होणार व सिंधेस मि॰ कागलन साहेब विलायतेहून येऊन जाणार असें समजतें.

काठेवाडांत या महिन्याचे आरंभीं वढवण येथें गुरांचें प्रदर्शन व जत्रा भरविली होती ती फार चांगली झाली. काठेवाडी घोडया, उंट, व विलायती गाई प्रदर्शनास पुष्कळ आल्या होत्या. एकंदर जनावरे सुमारें ८०० आलीं होतीं. काठेवाडांतलि बहुतेक राजांनीं घोडे व इतर जनावरे पाठविलीं होतीं. क्या॰ नट साहेब सेकंड असिस्टंट पोलिटिकल एजंट यांनीं व्यवस्था फार उत्तम ठेविली होती-

## पैशाचा हव्यास.

(अकोला यंगमेन्सक्लबमध्यें वाचलेला निबंध)

पैशावर जगांतील बहुधा सर्व व्यवहारिक सुखदु:खाची घडामोड अवलंबून असते. कोणाजवळ पुष्कळ पैसा असला ह्मणजे त्याचा प्रपंच सुखानें चालतो. लोक त्या पैसेवाल्याचें आर्जव करून असतात. पैसेवाल्याजवळ डागडागिणे, शेतमळे, बगीचे, वाडे, घोडे, गाड्या विपुल असतात. पैसेवाल्याजवळ चाकर पुष्कळ असतात, घरचीं माणसें यजमानाजवळ पुष्कळ पैसा पाहून आर्जवानें असतात. पैसेवाल्याला सरकारसंबंधी लोकांकडूनही गरिबाइतका त्रास पोंचत नाहीं. पैसेवाल्याचें काम सरकारच्या पदरचे लोक मोठया लाडीगोडीनें लाळ घोटून करित असतात. न्याय इनसाफामध्येंही पैसेवाल्याकरितां बहुत प्रसंगीं अन्याय किंवा डोळेझांक होते. कोणा अधिकाऱ्याकडे

गेले तर पैसेवाल्याला खुर्ची आधीं मिळते. वोलावण्याच्या किंवा वर्गणीच्या यादी झाल्या तर पैसेवाल्यांचीं नांवें वर असतात. याप्रमाणे लोकांच्या दृष्टींत पैशाचें स्वरूप मोठें महात्विक असे भरलेलें आहे. व पैशाच्या स्तावक पुष्कळ कवींचीं वचनेंही आहेत त्यांतून जीं स्मरताहेत तीं एथें सांगतों.

एका कवीनें पैसेवाल्याचे दुर्गुणही सद्गुण मानिले जातात ह्मणून एक श्लोक सांगितला आहे तो असा.

आलस्यं स्थिरता मुपैति भजते चांचल्य मुद्योगितां, मूकत्वंमित
भाषणं वितनुते मौढ्यं भवे दार्जवं ॥
पात्रापात्रविचारभावरहितो
गच्छ त्युदारात्मतां, मातर्लक्ष्मि तव
प्रसादवशतो दोषा अपि स्युर्गुणाः॥ १॥

ह्मणजे पैसेवाला आळशी असला तर मनाचा स्थीर ह्मणून त्याचें वर्णन करितात. बरें मनाचा चंचल असला तर आळशी नसून मोठा उद्योगी आहे अशी त्याची तारिफ करितात. तो आळ्यतेनें कोणाशी बोलत नसला तर मित भाषणी आहे, उगीच बडबड्या नाहीं असा त्याचा स्तव करितात. मूर्खपणानें भलता सलता खर्च करित असला तर त्याला उदार असें चांगलें विशेषण देतात इत्यादि प्रकारांवरून कवि ह्मणतो कीं हे माते लक्ष्मी तुझा ज्यावर प्रसाद होतो तो मनुष्य दुर्गुणी असला तरी गुणी होतो.

तसेंच मनुष्यामध्यें उत्तम गुण असले, उत्तम विद्या असली, आणि तो पैशानें प्रतिकूळ असला तर ते त्याचे सर्व प्रकार धिक्कारास पात्र होतात. याविषयीं एक कवि ह्मणतो.

श्लोक.

धिगस्त्वेतां विद्यां धिगपि कवितां धिक्
सुजनतां, वयो रूपं धिक् धिक्
धिगपि च यशो निर्धनवतां ॥ असौ
नीचात्येकः सकलगुणहीनोपि धनवान्,
अहो यस्य द्वारि तृणलवसमाः संति
गुणिनः ॥ २ ॥

याचा अर्थ—निर्धन मनुष्याच्या विद्येला धिक्कार असो, कविताशक्तीस धिक्कार असो, सौजन्याला धिक्कार असो, रूपाला, वयाला, यशाला धिक्कार असो, व त्याच्या इतर सर्व गुणांसही धिक्कार असो. ते सर्व काय करावयाचे आहेत? मनुष्याजवळ एक विपुल धन असलें ह्मणजे तो गुणहीनही असला तरी शेकडों गुणीजन त्याच्या दारीं केवळ गवतासारखे पडून असतात, यासाठीं दुसरें कांहीं नसलें तरी द्रव्य पाहिजे.

एक कवि ह्मणतो कीं सर्व गुण जे आहेत ते द्रव्याचे आश्रयानेंच राहतात. ह्मणजे ज्याजवळ द्रव्य आहे त्याजमध्यें सर्व गुण आहेत.

श्लोक.

यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः स पंडितः
स श्रुतवान् गुणज्ञः स एव वक्ता सच
दर्शनीयः सर्वे गुणाः कांचन
माश्रयंति ॥ ३ ॥

ह्मणजे ज्याजवळ द्रव्य असतें तो कुळीन असतो, ज्याजवळ पैका तो पंडित, ज्याजवळ धन तो बहुश्रुत, ज्याजवळ पैसा तो गुणज्ञ, ज्याजवळ संपत्ति तो वक्ता, ज्याजवळ वित्त तोच दर्शनास योग्य, कारण एका द्रव्याच्या आश्रयानें सर्व गुण राहतात.

दरिद्री मनुष्याला प्रपंचांत बहुत अडचणी येतात व तो आपल्या दारिद्र्याला शब्द लावितो. एका दरिद्री कवीनें आपल्या दारिद्र्याचें वाईट वर्णन करितां नां त्याची व्याजस्तुति केली आहे तो ह्मणतो.

श्लोक.

हे दारिद्र्य नमस्तुभ्यं, सिध्दोहं
त्वत्प्रसादतः ॥ पश्याम्यहं जगत्सर्वं,
न मां पश्यति कश्चन ॥ ४ ॥

याचा अर्थ—हे दरिद्रा तुला नमस्कार असो. तुझ्या प्रसादानें मी सिध्द पुरुष झालों. ह्मणजे मजमध्यें अशी सिध्दी आली आहे कीं, मला सर्व लोक दिसावे आणि मी कोणाला दिसूं नये. ह्मणजे वास्तविक अर्थ असा कीं दरिद्री मनुष्य कर्मपटाप्रमाणें समजून त्याकडे कोणी पहात नाहीं. (पुढें चालू)

## नोटिसा.

नोटिस—फकिरा वल्लद दळपतराव राहणार मौजे शिंदखेड परगणे नेर तालुके दारव्हे यास खालीं सही करणार इजकडून देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून मला ऋतु प्राप्त झाल्यास ७ वर्षें सुमारें झालीं. तूं पुरुषांत नाहींस त्याकरितां औषधोपाय करितो व तुला तोंपर्यंत माहेरी ठेवितो असें सांगून बापाचे घरीं आणून घातलेस. व पुढें दोन् वर्षांनीं मी पुन्हा तुजजवळ आलें तेव्हां तूं सांगितलें कीं मला तुजपासून कांहीं उपयोग नाहीं. तूं मोहतूर लाव माझी परवानगी आहे. तरी मी एक वर्षभर तुझे औषधाचे गुणाची वाट पाहिली. तेव्हां तूं मला वेगळें ठेवलेस व खर्चाकरितां रुपये देईन असा करार केलास. त्यावरून मी १२९ रुपये कर्ज काढलें व त्याचे व्याजाचे ७९ रुपये झाले आणि ते तुला द्यावयास मिळेनात तेव्हां खिसा पडला आणि तूं पंचमार्फत मला करारनामा लिहून दिला. त्याचीही मुदत तमाम झाली पुन्हा आपली उभयतांची पंचाईत होऊन तूं फारकतीचा करारनामा दिला त्यासही आज दीड वर्ष झालें. आतां मजकडे कांहीं अपराध नाहीं. व माझा ही तुजवर दावा राहिला नाहीं. तूं दुसरा नवरा कर. खर्चाचे रुपये एक वर्षानें देईन ह्मणून लिहून दिलेंस पण रुपये अद्यापि आले नाहींत. तगादा केला तर माझे गावीं येऊन खिसा करितोस हें बरोबर नाहीं. तर आतां पंधरा दिवसांचे आंत माझे रुपये द्यावे. नाहीं तर मी फिर्याद करून घेईन. तूं माझे घरीं येऊन खिसा करितोस याबद्दल माझे जिवास भीती प्राप्त झाली आहे. याकरितां तुला या नोटिशीनें कळवितें कीं, तूं माझे घरीं येऊं नये. व आलास तर फौजदारींत फिर्याद करून तुजपासून जामिन घेवविण्याची तजविज करीन. व आतां मला दुसरा नवरा पाहून मोहतूर लावण्यास कांहींच अटकाव राहिला नाहीं हें उघडच आहे. असो या एकंदर नोटिशीचा जबाब १५ दिवसांत द्यावा, नाही पेक्षां मी फिर्याद करीन. कळावें तारीख २० माहे जानेवारी सन १८७३.

( सही ) अहिलु इचे हातची निशाणी नांगडी.

नोटिस—बालचंद वल्लद सुकानंद मारवाडी वस्ती तालुके जळगाव जिल्हा अकोलें प्रांत वऱ्हाड यांसी खालीं सही करणार यांजकडून—तुह्माजवळ आमची हवेली तीन मजला बालाजीचे समोरची गाहाण असोन त्याजबद्दल तुम्हाजवळ आमचे सहीचें गाहाण पत्र आहे त्याजवरून आह्मी तुम्हाजवळ येऊन रुपये देत असतां तुम्ही करार केला कीं, चार महिने बरसात गेल्यावर जागा खालीं करून देऊं, व रुपयेही परत केले तेव्हां आह्मी तुमचे खातीरस्तव चार महिन्याची तकुबी दिली हल्लीं रुपये आह्मापाशीं तयार आहेत आमचा दस्तऐवज आम्हास देऊन आमची जागा ८ दिवसांत ही नोटिस पावल्यापासून खाली करून द्यावी. याप्रमाणें तुम्ही न केल्यास दर रोज ॥ प्रमाणें पंधरा रुपये माहवार भाडें भरून द्यावें लागेल खेरीज माझे इमारतीची पडझडीची जबाबदारी तुह्मावर असोन या नोटिशीचा खर्च तुह्मांवर आहे कळावें तारीख ११ जानेवारी, सन १८७३ इसवी.

( सही ) नारायण गुनाजी ताम्रन वस्ती कसबे जळगाव दस्तुर खुद्द.

नोटिस—वेशमी दादाभाई सोराबजी दोंटीवाला पारशी राहणार नवसरी हल्लीं मुक्काम वर्धा यास खालीं सही करणार देतो कीं, ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे कंपनीचे नागपुर लाइनी वरील रस्ता दुरुस्तीचे कंट्राक्ट रुस्तुमजी दादाभाई आणि कंपनी यांणीं घेतलें होतें. त्यांत तुमचा हिस्सा ९ आण्याचा असून त्यांत एक आण्याचा हिस्सा तुह्मी कावसजी बमनजी अंध्यारू यास दिला होता मशारनिल्हेनीं आपले हिशाप्रमाणें अडव्हान्स वगैरे दिले व कंट्राक्टचे कामही संपलें त्या मक्त्यांत जो नफा उत्पन्न झाला त्या नफ्याचा योग्य हिस्सा तुह्मी कवसजी बमनजी याजला दिला नाहीं याजकरितां ते तुम्हांवर फिर्याद करणार आहेत व त्यांणीं ही फिर्याद करण्याकरितां आम्हांजवळ देण्याचें ठरविलें आहे. तुह्मास मशारनिल्हेनीं अनेक वेळ पूर्वीं मागणें केलें व रितीप्रमाणें नोटिसही दिली. तुह्मी अद्यापि निकाल करित नाहीं सबब आमचे कडून पुन्हां एक वेळ नोटिस द्यावी असा त्याचा हेतु असल्यावरून त्यांचें सांगण्याप्रमाणें ही शेवटची नोटिस तुम्हांस देण्यांत येत आहे. तुह्मीं नोटिस पोंचल्यापासून पंधरा दिवसांचे आंत कावसजी बमनजी याजला त्याचे हिशाचा नफ्याचा पैसा द्यावा न दिल्यास रितीप्रमाणें तुम्हावर फिर्याद होईल. याजबद्दल तुमचा काय जबाब असेल तो आम्हांस अकोला एथें कळवावा कळावें ता० १८ जानेवारी सन १८७३ इसवी.

(सही) देवराव विनायक ...

नोटिस—रुक्मीबाई भ्रतार रा... ...णराव देशमुख व देशपांडे परगणे तालुके मजकूर जिल्हा खानदेश खालीं सही करणार याजकडून दे... येते कीं, आमचें कुटुंब आपले ए... वर्तलें, तिचे आंगावरील डागिने व... डे आम्हाकडेस पाठविण्याचे असून... ठविल्यामुळें आम्ही आजवर वाट... अखेर आपणाकडेस मुद्दाम सोनभट दकर याजला पाठविलें असतां अ... त्याजला कांहींच बरोबर रितीनें जबा... देतां व निकाल न करितां तसाच लावला. आमचे डागिने सुमार १... रुपये किमतीचे आहेत त्या बद्दल... णाकडील पत्रेंही तपशिलवार डागिन्या... यादीसहित एक दोन आहेत. या... या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं तु... आपसांत आज तारखेपासून एक महि... चे आंत निकाल केल्यास उत्तम आहे... हें पेक्षां आम्ही रितीप्रमाणें योग्य कोर्टा... दाद करूं. कळावें ता. २० माहे जा... नेवारी सन १८७३ इसवी.

[ सही ] अच्युतराव पुरुषोत्तमराव ... शपांडे मामले बाळा... जिल्हा अकोलें.

नोटिस—गिरजी मर्द गणाजी हांडे व... मौजे वडाळी तालुके अकोट जिल्हा अ... लें इजला तिचा नवरा नामें भोनाजी व... यादवजी हांडे, राहणार मुंडगाव ताल... अकोट याजकडून नोटिस देण्यांत ये... कीं तूं मजला ता० १२ डिसेंबरचे व... डसमाचारांत नोटिस दिली आहे... तिचें उत्तर:—

माझे घरीं न येण्याबद्दल व फारक... देण्याबद्दल तूं जे कारण दाखविलें तें अ... दीं खोटें आहे. जर तसें असतें तर... दुसरी स्त्री जवळ ठेविली नसती. तुझे... लशोभन होऊन आठ वर्षें झालीं इतक्या... कालांत कधींच तुझी अशी तक्रार न... ती व आतांच तिघाली यावरून तूं व... णाच्या नादी लागून अशा मदफैलीच्या गोष्टी सांगतेस असे सिध्द होतें यास्तव तुजला कळावें कीं मी तुला आपले जवळ ठेवून जनरितीप्रमाणें नांदविण्या... कबूल आहे याजकरितां मजकडून तुला फारकत मिळणार नाहीं. मी दोन च्यार वेळां तुजला न्यावयाला आलों असतां तूं आली नाहींस व तुझे बापानें तुला पाठविलें नाहीं अशी तुझी कसुर असल्यामुळें तूं खाण्याबद्दल ६० रुपये खर्च मागतेस तो तुला मिळणार नाहीं इतक्या उपर तूं माझे घरीं एक महिन्याचे आंत न आल्यास व गंधर्व वगैरे केल्यास तुजवर फौजदारी कोर्टांत फिर्याद करून सजा देवविण्याची तजवीज करीन हें पक्के समजावें कळावें तारीख ९ माहे जानेवारी सन १८७३ इसवी.

( सही )गणाजी वल्लद यादवजी हांडे राहणार मुंडगाव याचे हातची निशाणी दस्तुर उत्तमराव तुकाराम देशपाडे मौजे वडाळी.

हे पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. य.